११ सप्टेंबर, २०१९ ते २७ ऑक्टोंबर, २०१९ या कालावधीत "स्वच्छता ही सेवा" ही मोहीम राबविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः स्वमअ-२०१९/प्र.क्र. १०४/नवि-३४

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : ०९ सप्टेंबर, २०१९

वाचा-

(१) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक स्वभाअ २०१५/प्र. क्र. २३/नवि-३४ दिनांक १५ मे, २०१५.

(२) सचिव, आवासन और शहरी कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचे अर्ध शासकीय पत्र क्र.१८/३/२०१९-SBM-III, दिनांक २६ ऑगस्ट, २०१९.

(३) पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांची अधिसुचना क्रमांक प्लास्टिक-२०१८/प्र क्र २४/ताक-४, दिनांक ३०.०६.२०१८.

शासन परिपत्रक -

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या स्वप्नातील स्वच्छ भारताची संकल्पना साकारण्यासाठी मा. पंतप्रधान महोदयांनी महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त "स्वच्छ भारत" साकारण्यासाठी व्यापक जनचळवळ उभारण्याचे आवाहन करून दिनांक २ ऑक्टोबर, २०१४ पासून देशामध्ये स्वच्छ भारत अभियान राबविण्यास सुरुवात केली आहे. या अभियानास ५ वर्ष पूर्ण होत असल्याच्या अनुषंगाने या अभियानांतर्गत अपेक्षित ध्येय साध्य करण्यासाठी समाजातील सर्व घटकांच्या सहभागाने **"स्वच्छता ही सेवा"** या विषयावर एक राष्ट्रव्यापी मोहीम राबविण्याबाबत संदर्भीय क्रमांक २ येथील पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

२. केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाच्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) संदर्भीय क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे. केंद्र शासनाने संदर्भीय क्रमांक २ येथील पत्रान्वये कळविल्यानुसार राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ ते दिनांक २७ ऑक्टोबर, २०१९ या कालावधीत **"स्वच्छता ही सेवा"** हा विषय घेऊन मोहीम राबविण्यात यावी.

३. या मोहिमेंतर्गत राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी पुढीलप्रमाणे नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार कार्यवाही करावी.

टप्पा - १	दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ ते १ ऑक्टोबर, २०१९	तयारी आणि जागरूकता
टप्पा - २	दिनांक २ ऑक्टोबर, २०१९	श्रमदान चळवळ
टप्पा - ३	दिनांक ३ ऑक्टोबर ते २७ ऑक्टोबर २०१९	गोळा केलेल्या प्लास्टिकचे पुर्नचक्रीकरन (रिसायकल) / व्हिलेवाट लावणे व प्लास्टिक मुक्त दिवाळीकडे वाटचाल करणे

४. “स्वच्छता ही सेवा” या मोहिमेच्या काळात नागरिक, इतर संस्था व घटकांनी शहरातील शक्य त्या ठिकाणी श्रमदानाद्वारे स्वच्छता करावी, जेणेकरून शहरातील प्रत्येक कानाकोपरा प्लास्टिक मुक्त झाल्याचे दृश्य पहावयास मिळू शकेल. तसेच, याद्वारे शहरांमध्ये खऱ्या अर्थाने “जन आंदोलन” उभं राहू शकेल. या मोहिमेच्या काळात नागरिकांच्या सहभागातून तसेच माहिती, शिक्षण व संवादासह (IEC) श्रमदान करताना राबविण्यात येऊ शकणाऱ्या उपक्रमांची सूची **परिशिष्ट-१** मध्ये सोबत जोडली आहे. तसेच, सार्वजनिक कार्यक्रम साजरे करताना व शहरे प्लास्टिक मुक्त करताना करावयाचे कार्यक्रमाची यादी **परिशिष्ट - २** मध्ये सोबत जोडली आहे.

५. उपरोक्त सर्व उपक्रमांचे सनियंत्रण सर्वोच्च पातळीवर करण्यात येणार असल्याने, उपक्रम राबविण्यापूर्वीचे फोटो / व्हिडीओ व उपक्रम राबविल्यानंतरचे फोटो / व्हिडीओ तसेच उपक्रमाबाबतचे सविस्तर विवरण स्वच्छतामंच यावर अपलोड करण्यात यावेत. तसेच, स्वच्छ सर्वेक्षण - २०२० च्या अनुषंगाने सुध्दा ही बाब महत्वाची असल्याने या मोहिमेवर विशेष लक्ष देऊन सदर मोहिम यशस्वी करण्यात यावी.

६. या अनुषंगाने सर्व नागरी स्वराज्य संस्थांना कळविण्यात येते की, स्वच्छता ही सेवा या मोहिमेमध्ये सर्व शासकीय कार्यालये, बिगर सरकारी संस्था, रहिवाशी संघटना, व्यापारी संघटना यांना सहभागी करुन घेण्यात यावे. संपुर्ण शहर, बाजार बंदी असलेल्या प्लास्टिकपासून मुक्त करण्यात यावा. ०२ ऑक्टोबर, २०१९ ला याबाबत व्यापक मोहिम राबविण्यात येऊन प्लास्टिक गोळा करण्यात यावे. प्लास्टिकची वर्गवारी करुन स्थानिक स्वराज्य संस्थेने या गोळा केलेल्या प्लास्टिकचा मटेरीयल रिकव्हरी फॅसिलीटी केंद्रावर (साहित्य पुर्नस्थापना केंद्र) साठा करुन ठेवावा. त्यानंतर ०३ ऑक्टोबर ते २७ ऑक्टोबर, २०१९ या कालावधीत जमा केले प्लास्टिक पुर्नचक्रीकरन केंद्राकडे पाठविण्यात यावे, पुर्नचक्रीकरन शक्य नसणारे प्लास्टिक सिमेंट कंपन्यांना द्यावे. त्यासाठी सर्व नागरी स्वराज्य संस्थेने एका नियंत्रण अधिकाऱ्याची नेमणूक करावी व त्याचा दुरध्वनी क्रमांक संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान, मुंबई यांना कळवावा. देशातील सिमेंट कंपन्यांनी त्यांच्या कारखान्यांच्या २०० किलोमिटर परिघात असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांनकडून असे प्लास्टिक नेण्यास सहमती दर्शविली आहे. यात सुसूत्रता राहावी म्हणुन प्रत्येक जिल्ह्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांनी गोळा केलेले पुर्नचक्रीकरन न होऊ शकणारे प्लास्टिक त्यांच्या जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्लास्टिक संकलन केंद्रावर पाठविण्याची व्यवस्था करण्यात यावी. पुर्नचक्रीकरन न होऊ शकणारे प्लास्टिक बेलींग मशिनच्या सहाय्याने बेलमध्ये साठा करुन ठेवावेत व याठिकाणी पाणी व आग प्रतिबंधक साधने असतिल यांची खात्री करावी. पुर्नचक्रीकरन न होऊ शकरणारे प्लास्टिकचा वापर स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांचे रस्ते तयार करतेवेळी करावा त्याच प्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाने देखील त्यांचे रस्ते तयार करताना या प्लास्टिकचा वापर करावा. रस्ते तयार करताना प्लास्टिकचा वापर करणेबाबत IRC : SP-98-2013 मध्ये (Specification) तपशिलवार देण्यात आलेले आहे.

७. **“स्वच्छता ही सेवा”** या मोहिमेच्या काळात राबविण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमांबाबतचे अहवाल पुढील बाबींचा समावेश करून दररोज स्वच्छतामंच यावर अपलोड करण्यात यावेत.

- **“स्वच्छता ही सेवा”** या मोहिमेच्या काळात शहरात राबविण्यात येणारे उपक्रम / करण्यात येणारी कामे.
- उपक्रमाद्वारे शहरात झालेला परिणाम दिसून येण्यासाठी, स्वच्छता व इतर उपक्रम राबविण्यापूर्वीचे फोटो/व्हिडीओ तसेच स्वच्छता व इतर उपक्रम राबविल्यानंतरचे फोटो/व्हिडीओ.
- उपक्रमात सहभागी झालेल्या नागरिकांची अंदाजित संख्या.

८. राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ ते दिनांक २७ ऑक्टोबर, २०१९ या कालावधीत **“स्वच्छता ही सेवा”** ही मोहीम संपन्न झाल्यानंतर २८ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत याबाबतचा दिनांकनिहाय राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा एकत्रित अनुपालन अहवाल फोटो/व्हिडीओसह संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांना तसेच सह सचिव तथा अभियान संचालक, स्वच्छ भारत अभियान, भारत सरकार, नवी दिल्ली यांना व राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान, मुंबई यांना सादर करण्यात यावा.

९. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९०९१६०१२००३२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kailas Madhukar Badhan

Digitally signed by Kailas Madhukar Badhan
DN: CN = Kailas Madhukar Badhan, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Urban Development Department
Date: 2019.09.09 18:00:32 +05'30'

(कैलास बधान)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री, यांचे खाजगी सचिव.(सर्व)
४. मा. राज्यमंत्री, यांचे खाजगी सचिव (सर्व).
५. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग (सर्व), मुंबई.
७. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
८. महासंचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था.
९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. सर्व विभागीय आयुक्त.
११. सर्व जिल्हाधिकारी.

१२. राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी), मुंबई.
१३. आयुक्त, सर्व महानगरपालिका.
१४. मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा/ नगर पंचायती.
१५. निवडनस्ती (नवि-३४).

परिशिष्ट - १

स्वच्छता ही सेवा या कार्यक्रमाअंतर्गत राज्य / केंद्रशासित प्रदेश आणि शहरांनी करावयाच्या उपक्रमांची यादी दिनांक ११ सप्टेंबर - २७ ऑक्टोबर, २०१९

अनु क्रमांक	टप्पा	दिनांक	सुचविलेल्या कामांचा तपशिल
१	**तयारी आणि जागरूकता**	११ सप्टेंबर, २०१९ ते १ ऑक्टोबर, २०१९	• सर्व शहरी भागात जन जागरूकता निर्मिती उपक्रम • शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती कार्यक्रमांवर लक्ष केंद्रित करणे • स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्लास्टिक कचरा संकलन आणि पृथक्करण करण्यासाठीची ठिकाणे निश्चित करणे. • स्थानिक स्वराज्य संस्थांनी संकलन केंद्रपर्यंतची वाहतूक मार्गाची योजना तयार करणे. • सर्व संकलीत आणि जमा केलेले प्लास्टिक (विशेषत: रेल्वेमार्ग, राष्ट्रीय महामार्गापासून जमा केलेले) कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी तयारी करणे • प्लास्टिक पिशव्यांच्या ऐवजी कापडी पिशव्यांचा वापर करण्याबाबत मोहिम राबविणे.
	श्रमदान	२ ऑक्टोबर, २०१९	**राष्ट्रीय** ✓ प्लास्टीक मुक्त भारत असण्याबाबत प्रतिज्ञा घेणे. ✓ फक्त एक वेळी वापर होऊशकणाऱ्या प्लास्टिकचा वापर न करणे. **सामुदायीक श्रमदान** ✓ सर्व शहरांमध्ये खुप मोठ्याप्रामाणात प्लास्टिक गोळा करण्याबाबत मोहिम राबविणे. ✓ सर्व शहरांमध्ये प्लास्टिक कचरा विलगीकरणाबाबत मोहिम राबविणे.
	पुर्नचक्रीकरन (रिसायकल) / व्हिलेवाट लावणे	३ ते ७ ऑक्टोबर, २०१९.	स्थानिक स्वराज्य संस्थानमधील प्रभागामध्ये गोळा केलेला कचरा संकलन केंद्रावर वाहून नेणे.
		८ ते १० ऑक्टोबर, २०१९.	स्थानिक स्वराज्य संस्थानी संकलन केंद्रावर गोळा केलेला कचऱ्याचे पुर्नचक्रीकरनसाठी योग्य व अयोग्य असणाऱ्या कचऱ्याचे विलगीकरण करणे.
		११ ते २७ ऑक्टोबर, २०१९	संबंधीत कंपनीकडे पुर्नचक्रीकरनसाठी / विल्हेवाट लावण्यासाठी कचऱ्याची वाहतूक करणे

परिशिष्ट - २

सार्वजनिक कार्यक्रम साजरे करताना व शहरे प्लास्टिक मुक्त करताना राबविण्याचे उपक्रम

अनु क्रमांक	सुचविलेल्या कामांचा तपशिल
१	कोणत्याही कार्यक्रमामध्ये एकदाच वापर होऊ शकणाऱ्या प्लास्टिकच्या वस्तुंचा वापर करण्यात येऊ नये. (उदा. पाणी बॉटल, प्लास्टिक भांडी, आवेष्टन पेपर, डबे इत्यादी)
२	कार्यक्रमासाठी भांडे पुरविण्यासाठी भांडी भंडार तयार करणे.
३	वापर करण्यात आलेल्या प्लास्टिकची तातडीने पुर्नचक्रीकरन केंद्राकडे वाहतूक करण्यासाठी व्यवस्था करणे
४	प्रत्येक शहरामध्ये पुर्नचक्रीकरनसाठी आलेल्या प्लास्टिकचा साठा करण्यासाठी मटेरिअय रिकव्हरी फॅसिलीटी केंद्राची स्थापना करणे
५	सर्व शासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रमांकची कार्यालये या ठिकाणी सिंगल युज प्लास्टिकचा वापर बंद करणे.
६	सर्व FMCG उत्पादकांशी EPR तयार करण्याबाबत चर्चा करणे
७	सर्व कचरा गोळा करणारे, कबाडीवाले व रिसायक्लर्स यांची एकत्रित कचरा व्यवस्थापन प्रणाली तयार करणे.
८	स्थानिक भाषेमध्ये प्लास्टिक वापरा विरोधात द्रकश्राव्य माध्यमातून ऑडीओ, व्हिडीओ तयार करुन रेडीओ, टि व्ही किंवा वर्तमान पत्रामधुन प्रसिध्दी देणे
९	विगर सरकारी संस्था, स्वयंसहायता ग्रृप यांचे मार्फत घरोघरी जाऊन कापडी पिशवी (झोला) गोळा करणे व स्वच्छ करुन पुन्हा घराघरात पोहचविणे.
१०	भेट वस्तु देण्यासाठी कापडी आवेष्टनाचा वापर करण्यासाठी नागरीकांना प्रवृत्त करणे
११	सणासुदीच्या दिवसांमध्ये भेट वस्तु म्हणून कापडी पिशवी देणेबाबत नागरीकांना प्रवृत्त करणे
१२	शाळा महाविद्यालयीन विद्यार्थी त्याच प्रमाणे नगारीक बिगर सरकारी संस्था यांना प्लास्टिक मुक्त भारत करण्याबाबतची प्रतिज्ञा देणे.
१३	स्वच्छतेबाबत निबंध, चित्रकला, नाटक याबाबत आंतर शालेय स्पर्धा आयोजित करणे
१४	नागरीकांची पदयात्रा आयोजित करणे त्यामध्ये सरकारी कार्यालये, विगर सरकारी संस्था, स्वंय सहायता ग्रुप यामधील कर्मचाऱ्यांचा समावेश करणे . स्थानिक नागरी संस्थांनी नागरीकांना प्लास्टिक कचरा गोळा करण्यासाठी पिशवी व काठी पुरविणे
१५	नागरीक व बिगर सरकारी संस्थांना पाण्याचे स्रोत सागरी किनारे, नदि किनारे साफ करण्याबाबत प्रवृत्त करणे
१६	सर्व समुद्र किनारे व पाण्याच्या स्रोता जवळ असणाऱ्या हॉटेल, रेस्टॉरंट यांना प्लास्टिकचा वापर न करणेबाबत प्रवृत्त करणे
१७	घरपोच सेवा देणाऱ्या हॉटेल, रेस्टॉरंट साखळयांना प्लास्टिकच्या भांड्यांऐवजी इतर भांडी वापरण्याबाबत प्रवृत्त करणे

१८	जे नागरीक स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्लास्टिक संकलन केंद्रावर प्लास्टिक जमा करतील त्यांना प्रात्साहन देणे.
१९	नागरीक व प्लास्टिक विषयातील तज्ञ यांचा सेमिनार, कार्यशाळा आयोजित करुन शहर प्लास्टिक मुक्त कसे करता येईल याबाबत चर्चा करणे
२०	सर्व धार्मिक नेते, वक्ते यांनी त्यांच्या भाषणांमध्ये प्लास्टिकचा वापर कमी करण्याबाबत लोकांना उपदेश देण्याबात प्रवृत्त करणे
२१	प्रत्येक महीन्यामध्ये किमान एक दिवस प्रत्येक शहरामध्ये प्लास्टिक मुक्त दिवस म्हणून पालन करणे
२२	प्लास्टिक मुक्त शहर या विषयाबाबत ज्या बिगर सरकारी संस्थेने / नागरीकांनी उल्लेखनीय काम केले आहे. त्यांचा सत्कार करणे
२३	ज्या रहिवाशी संघटना, हॉटेल किंवा जास्तीत जास्त कचरा निर्माण करणारे संस्था प्लास्टिक मुक्त झालेले आहेत, त्यांचा सत्कार करणे

Annex-1

Suggested List of Activities for States/UTs and Cities for Swachhata Hi Seva: 11th September – 27th October 2019

Sl No	Phase	Date(s)	Suggested list of activities
1	**Preparation and Awareness**	11th September – 1st October, 2019	• Mass awareness generation activities across all urban areas • Focused awareness activities in schools and colleges • ULBs to identify locations for plastic waste collection & segregation • ULBs to plan transportation logistics to ULB collection hubs • Preparation for collection and disposal of all accumulated plastic waste, specifically from railway tracks and national highways • Campaign on replacing plastic bags with jute/cloth bags with mass production
2	**Shramdaan**	2nd October 2019	• **National:** ✓ *Pledge for a Plastic Waste Free India* ✓ *States/UT to announce ban on Single Use Plastics (if ban not already in place)* • **Community shramdaan** ✓ *Massive plastic waste collection drives by all, across all urban areas* ✓ *Mass segregation drives in all urban areas*
3	**Recycle / Disposal**	3rd – 7th October, 2019	Transportation of collected waste from all wards to ULB collection hubs
		8th – 10th October, 2019	Segregation into recyclables and non-recyclables
		11th – 27th October, 2019	Transportation to industries for recycling/disposal

Annex-2

Suggested List of Activities for Making public events and cities Plastic-free

Sl No	Suggested Activities
1	Declare complete ban on usage of any single-use plastic items (cutlery, water bottles, wrappers, containers etc) during any public event / festival.
2	Encourage setting up of **'Bartan Bhandars'**, **'jhola bhandars'** etc. for providing alternative options to plastic containers / utensils during any public events
3	Ensure adequate numbers of collection vehicles for collecting and transporting the plastic waste to authorized recycling / processing facilities.
4	Set up adequate numbers of **Material Recovery Facilities** in every city to handle recycle and/or processing of collected plastic waste
5	Impose complete ban on use of single-use plastics in all government office and residential premises across the state, including those of PSUs and related entities
6	Hold meetings with FMCG manufacturers / users to discuss how they can contribute to the theme as part of their EPR mandate
7	Integrate all informal rag pickers, kabadiwalas, recyclers into the formal waste management system
8	Create audio-video creative (videos, jingles, print-ads) in local language on the 'plastic-free' theme and disseminate widely on local radio, TV, print and social media
9	NGOs and SHG groups may conduct 'jhola' (cloth bag) collection drives among households, and after cleaning them, re-distribute them among households for use in shopping, etc.
10	Encourage citizens and organisations to use cloth bags as gift wraps during festival gifting
11	Encourage citizens and organisations to give cloth bags as gifts during the festival season
12	Organize Swachhata Rallies and pledges by school / college students, citizens, NGOs, RWAs, corporates on the theme of '*plastic-mukt Bharat'*
13	Organise Inter-school Swachhata competitions (essay writing, painting, drama, nukkad natak, etc) on the theme of *plastic-mukt Bharat'*
14	Organise Plogging drives by citizens (with participation from govt. officials, NGOs, SHGs, corporates, religious leaders, swachhata ambassadors): ULBs to provide citizens with bags, sticks and other necessary equipment to collect plastic trash. The groups collecting maximum trash may be suitably acknowledged/ felicitated by ULBs at local level.
15	Encourage NGOs and citizens to hold cleaning drives around water bodies, beaches, riverfronts, lakes and ponds to clear plastic debris
16	Ban all eateries / shops along beaches and water fronts from using plastic containers and wrappers.
17	Encourage all food / restaurant aggregators to replace plastic delivery containers with bio-degradable options

Sl No	Suggested Activities
18	Incentivise citizens to deposit plastic waste at ULB-authorised collection centres.
19	Organise seminars, workshops for citizens with experts in the field to discuss how the city can be made plastic-free.
20	Encourage all religious leaders and public speakers to reiterate and stress the necessity for reducing plastic use, during their public discourses
21	Earmark at least one day of every month as 'plastic-free' day in every city.
22	Felicitate NGOs/citizens who have done exemplary work on the 'plastic-ban' theme
23	Felicitate RWAs, Hotels, and other Bulk-Waste Generators who have become 'plastic-free' and incentivize them

** Please note that this is an indicative list. States and cities may undertake any other activity (ies) that celebrate the spirit of a Jan Andolan*